महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

सोमवार ■ १४ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०२३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## जिल्हा परिषद , पंचायत समित्यांचा निवडणूक प्रभाग रचना मसुदा प्रसिद्ध

### हरकतींसाठी २१ जुलैपर्यंत मुदत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पाच पंचायत समित्यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी, जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग आणि पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. राज्य शासनाने यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून ठाणे जिल्हाधिकारी यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भातील १४ जुलै रोजीचा आदेश व त्याचा मसुदा ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तसेच कल्याण, भिवंडी, शहापूर, मुरबाड आणि अंबरनाथ येथील तहसिलदार व पंचायत समिती कार्यालयांच्या फलकावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. या प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना करण्यासाठीची अंतिम मुदत २१ जुलै घोषित करण्यात आली आहे. प्रसिद्ध करण्यात आलेला हा मसुदा, राज्य शासन किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी — जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अशोक शिनगारे — यांच्या १४ जुलैच्या आदेशानुसार विचाराधीन धरला जाईल. या आदेशाच्या मसुद्यावर कोणाला हरकत किंवा सूचना असल्यास, त्या संबंधित सकारण लेखी निवेदने, हरकती किंवा सूचना २१ जुलै पर्यंत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर कराव्यात. यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकती, सूचना किंवा निवेदने विचारात घेतले जाणार नाहीत, असेही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




## शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाणावर आज सुनावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शिवसेना पक्षाचे नाव आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निकाला विरोधात ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर उद्या १४ जुलैला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.हे प्रकरण सुप्रीम कोर्टात सूचिबद्ध झाल्याने आता दीड वर्षांनंतर या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. २ जुलैला झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरणी १४ जुलै रोजी सुनावणी घेण्यास मान्यता दिली आहे. यामुळे आगामी महापालिका निवडणुकीपूर्वी शिवसेना चिन्हाचा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





## कायदेपंडित उज्ज्वल निकम यांची राज्यसभेवर नियुक्ती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रख्यात कायदेपंडित उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती कोट्यातून ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे. उज्ज्वल निकम यांच्याबरोबरच भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, शिक्षणतज्ज्ञ सी सदानंदन मास्ते, शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांचीही राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्य म्हणून म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्षाने उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून प्रख्यात कायदेपंडित उज्ज्वल निकम यांना लोकसभेची उमेदवारी दिली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. काँग्रेसच्या नेत्या वर्षा गायकवाड यांनी उज्ज्वल निकम यांचा पराभव केला होता. लोकसभेला पराभव झाल्यानंतर आता उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील कसाबला फाशीच्या शिक्षेपर्यंत पोहचवण्यापर्यंत वकील उज्ज्वल निकम यांची मोलाची भूमिका राहिली होती. उज्ज्वल निकम यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिलं होतं. त्यामुळे आता उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपतींनी त्यांच्या विशेष अधिकारांचा वापर करून उज्ज्वल निकम यांच्यासह माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, शिक्षणतज्ज्ञ सी सदानंदन मास्ते, शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांची राज्यसभेवर नियुक्ती केली आहे.

**"आपलं दोन्ही भाषेवर प्रभुत्व आहे. तुम्ही कोणत्याही भाषेत माझ्याशी संवाद साधू शकता, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माझ्याशी मराठीत संभाषण केलं आणि मला सांगितलं की राष्ट्रपती तुमच्यावर एक जबाबदारी सोपवू इच्छित आहेत. ही जबाबदारी देशाच्या दृष्टीकोनातून तुम्ही चांगली सांभाळाल अशा मी तुम्हाला शुभेच्छा देतो. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी आभार मानतो"**

■ उज्ज्वल निकम

## राष्ट्रहितचा विचार करणाऱ्या सर्वांना सोबत घेऊ - प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात यावर्षी होणाऱ्या स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामध्ये मुंबई महापालिकेची निवडणूक विशेष महत्त्वाची आहे. मुंबई महापालिका जिंकण्यासाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन नेते एकत्र येणार अशी चर्चा आहे. दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी तसे संकेतही दिले आहेत. त्याचवेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी उद्धव ठाकरेंनाच सोबत घेण्याची तयारी दाखवली आहे. 'NDTV मराठी' ला दिलेल्या एक्स्क्लुझिव्ह मुलाखतीमध्ये त्यांनी हे मोठं वक्तव्य केलं आहे.

**काय म्हणाले चव्हाण?**

अजित पवार ज्याप्रमाणे आमच्या विचारधारेबरोबर जोडले गेले, तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत राष्ट्रहितचीा विचार करत कुणी आमच्यासोबत येत असेल तर भविष्यात उद्धव ठाकरेंनाही सोबत घेऊ असं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं आहे. उद्धव ठाकरे यांनी आमचे विचार सोडले. ते आता जनसुरक्षा विधेयकाला विरोध करत वेगळी भूमिका घेत आहेत. जे चांगलं आहे, त्याला चांगलं म्हंटलं पाहिजे. पण ते विरोधासाठी विरोध करत आहेत, अशी टीकाही चव्हाण यांनी उद्धव ठाकरेंवर केली. उद्धव ठाकरे यांनी त्यांची आधीची भाषा बदलली. आम्ही आमची भाषा आणि लाईन कधीच बदलली नाही. कुठेतरी इगो बाजूला ठेवून बाळासाहेबांच्या विचारांवर ठाकरे यांनी जायला हवं, असंही त्यांनी यावेळी सांगितलं. दोन ठाकरे एकत्र येतील की नाही हे तेच ठरवतील. आम्ही आमचं संघटन वाढवू, ताकद वाढवू असं चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट केलं.



**'म' मराठीचा नाही 'म' मतांचा'**

ठाकरे हे म मराठीचा विचार न करता म मतांचा विचार करतात. मराठीच राजकारण ठाकरे हे निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच करतात, असंही चव्हाण यांनी यावेळी सांगितलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आम्ही विकास कामांच्या जोरावरच लोकांकडे मतं मागणार असल्याचं चव्हाण यांनी जाहीर केलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युती होणार का? याबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री घेतील. 2017 ला आम्ही मुंबई महापालिकेचं महापौरपद शिवसेनेला दिलं होतं त्यावेळेस काय झालं सगळ्यांनाच माहिती आहे, याची आठवणंही त्यांनी करुन दिली.




**थोडक्यात महत्वाचे**

## दहा दिवसात २०० मुले शिक्षण प्रवाहात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : एकही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी ठाणे जिल्ह्यात शाळाबाह्य मुलांची शोध मोहीम पंधरवडा राबविण्यात येत आहे. त्यानुसार, १ जुलै ते ११ जुलै या दहा दिवसाच्या कालावधीत जिल्ह्यात २०० शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात जिल्हा विभागाला यश आले आहे. यामध्ये सर्वाधिक म्हणजेच १०९ मुलांचा सहभाग असल्याची माहिती जिल्हा शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात रोजगारासाठी अनेक कुटूंबे येत असतात. या कुटुंबामध्ये शाळकरी मुलांचा समावेश असतो. या वाढत्या स्थलांतरामुळे शाळाबाह्य मुलांचे आणि त्यातही मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती असते. त्यामुळे शाळाबाह्य, स्थलांतरित आणि शाळेत अनियमित असलेल्या बालकांची दरवर्षी जिल्हास्तरावर शोध मोहीम घेण्यात येते. त्यानुसार, यंदाच्या वर्षी १ जुलै ते १५ जुलै या कालावधीत शाळाबाह्य मुलांची शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

## भिवंडीतील ग्रामपंचायत सरपंचपदासाठी उद्या आरक्षण

### - तहसीलदार अभिजित खोले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १३ (वार्ताहर) :** तालुक्यातील १२१ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण मंगळवारी (ता. १५) शहरातीलकामतघर येथील वऱ्हाळदेवी माता मंगल भवनात सकाळी अकरा वाजता काढण्यात येणार आहे, अशी माहिती तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली आहे. तालुक्यातील १२१ ग्रामपंचायतींपैकी ४१ ग्रामपंचायतींचा समावेश अधिसूचित क्षेत्रात आहे. या सर्व ग्रामपंचायतींच्या २०२५ ते २०३० दरम्यान होणाऱ्या सर्वसाधारण निवडणुकीत सरपंचपदाचे आरक्षण या सोडतीत केले जाणार आहे. ग्रामविकास विभागाने ५ मार्च रोजी सरपंच आरक्षण सोडतीबाबत अध्यादेश जारी केला होता. त्यानुसार राज्यभरात तालुकास्तरावर ही आरक्षण सोडत झाली होती, त्यानुसार भिवंडी तालुक्यातील सरपंच आरक्षण सोडत १३ मे रोजी काढण्यात आली होती. दरम्यान, काही जिल्ह्यांमध्ये आरक्षण सोडतीमध्ये त्रुटी राहिल्याने शासनाने पुन्हा नव्याने आरक्षण सोडत काढण्यासंदर्भात १३ जून रोजी अधिसूचना जारी केली आहे. त्यानुसार १३ मे रोजीची अधिसूचना रद्द ठरविण्यात आली आहे. त्यामुळे भिवंडी तालुक्यातील सरपंचपदाचे नव्याने प्रवर्गनिहाय आरक्षण सोडत होत आहे. आधीच्या सरपंच आरक्षण सोडतीनंतर अनेकांनी राजकीय मोर्चेबांधणीस सुरुवात केली होती. त्यामुळे आता नव्याने आरक्षण सोडत होत असल्याने अनेकांचा हिरमोड झाला आहे.

## शहापूर तालुक्यातील ६५ गावांच्या रस्त्यांची दुरावस्था

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**"फुगाळे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या वरसवाडी ते आघाण वाडी या जोडरस्त्याच्या कामासाठी पंचायत समितीत 31 जुलै 2023 रोजी ग्रामपंचायतने ठराव करून लेखी पत्र दिले होते. मात्र याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने आजही आदिवासी बांधवांच्या नशिबी झोळीतील जीवघेणा प्रवास आहे."** ■ रामा आघाण, स्थानिक नागरिक

एकीकडे सरकार 'आरोग्य यंत्रणा तुमच्या दारी' अशा घोषणा करत असताना मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या शहापूरकरांना अक्षरशः रोजच 'सलाइन'वरचे जीवन जगावे लागत आहे. रस्ताच नसल्याने वरसवाडीतील एका महिलेला मध्यरात्री झोळीतून रुग्णालयात न्यावे लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आमची या नरकयातनेतून सुटका कधी होणार? असा टाहो वरसवाडीसह या परिसरातील 65 गावांतील ग्रामस्थांनी फोडला आहे.

शहापूर तालुक्यातील आदिवासी पाड्यात जाण्यासाठी मुख्य रस्ते नसल्याने आजही येथील आदिवासी बांधवांना ठेचकळत, कसरत करून ये-जा करावी लागत आहे. फुगाळे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या वरसवाडीतील महिला मंदाबाई आघाण (वय 52) यांच्या अचानक छातीत दुखू लागले. त्यांची प्रकृती चिंताजनक झाली. वेळेत रुग्णालयात दाखल केले नाही तर महिलेच्या जीवाला धोका निर्माण होण्याची भीती होती. अखेर येथील गावकऱ्यांनी बांबूला चादर बांधून झोळी तयार केली. या झोळीतून मंदाबाई यांना पाच किलोमीटरचा प्रवास करून इगतपुरीच्या सरकारी रुग्णालयात दाखल केले.

कोळीपाडा, तळयाचीवाडी, कातकरी वस्ती, फर्जनवाडी, कोठावाडी, भितारवाडी, चाफेवाडी, साखरवाडी, पाटीचा माळ, कृष्णाची वाडी, सोनार शेत, देवीचा पाडा, लोभीपाडा, पेढ्याचा पाडा, पाटीलवाडी, वारलीपाडा, माळीपाडा, हेदूपाडा, जांभुळपाडा, आल नपाडा, भरवपाडा आदी 65 गावपाड्यांना जोडणारा मुख्य रस्ताच नाही.

## आज राज्यातील हॉटेल्स रेस्टॉरंट्स बंद

### दारूवरील व्हॅट, परवाना शुल्कवाढीला विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्य सरकारने नुकतेच दारूवरील मूल्यवर्धित कर (व्हॅट) दुप्पट, परवाना शुल्कात १५ टक्के वाढ आणि उत्पादन शुल्कात केलेल्या ६० टक्के वाढीविरोधात भारतीय हॉटेल्स आणे रस्टॉरंट्स संघटनेने सोमवारी (१४ जुलै) राज्यातील हॉटेल्स बंदची घोषणा केली आहे. या अचानक झालेल्या करवाढीमुळे लघु व मध्यम स्तरावरील हॉटेल्स, बार व परवाना रूम्स प्रचंड आर्थिक संकटात सापडल्या आहेत, असे संघटनेचे म्हणणे आहे. अनेक व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असून, हजारो लोकांच्या रोजगारावर गडद सावली पडत आहे. सरकारच्या या कृतीचा सर्व संघटना विरोध करीत असून महाराष्ट्र इंडस्ट्री डेव्हलपमेंट असोसिएशनने या बंदला पाठिंबा जाहीर केला आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील बार आणि परवाना रूम्स बंद राहिल्याने राज्य सरकारला दररोज कोट्यवधी रुपयांचा उत्पादन शुल्क आणि व्हॅट गमवावा लागू शकतो. कोविडनंतर सावरत असलेल्या लघु आणि मध्यम व्यवसायांना या बंदमुळे गंभीर आर्थिक नुकसान आणि संभाव्य बंदीचा सामना करावा लागणार असून बार आणि रेस्टॉरंट्ससाठी काम करणाऱ्या सुमारे ४८,००० पुरवठादारांवर मागणी घटल्यामुळे तात्पुरती पण तीव्र आर्थिक अडचण निर्माण होणार आहे.

गोवा, दमण-दीवसारख्या कमी कर असलेल्या राज्यांतून अवैध मद्य वाहतूक आणि विक्री वाढून कायदेशीर व्यवसायांची हानी देखील होऊन राज्याच्या राजस्वावर परिणाम होणार आहे. मुंबई आणि पुणेसारख्या शहरांतील नाइटलाइफ व खाद्यसंस्कृतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे मत व्यक्त केले जात आहे. कोणत्याही प्रकारच्या करामध्ये बदल करताना किंवा वृद्धी करताना राज्य शासनाने संबंधित संघटनांशी चर्चा करणे गरजेचे असून कमीत कमी ६ महिने अगोदर याबाबत हरकती व सूचना मागविल्या पाहिजेत. त्यावर चर्चा करून मगच निर्णय घेतला जावा त्याचप्रमाणे सरकार अशाप्रकारे झिजीया कर लावून उद्योजकांना त्रास देणार असेल तर सर्व संघटनांनी एकत्र येऊन त्याला विरोध करावा, असे आवाहनही चंद्रकांत साळुंखे यांनी केले आहे.









# अहमदाबाद विमान दुर्घटनेचा प्राथमिक अहवाल सादर



गुजरातमधील अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातामागचं कारण उघड करणारा प्राथमिक अहवाल (प्रिलीमिनरी रिपोर्ट) जाहीर करण्यात आला आहे. हा रिपोर्ट कोणत्याही अंतिम निष्कर्षापर्यंत येत नाही. मात्र, त्यामधून पायलट्सच्या त्यावेळच्या संभाषणाचे तपशील पुरवलेले आहेत. या अपघातामध्ये एकूण 260 जणांचा मृत्यू झाला होता. त्यापैकी 241 जण हे विमानातील प्रवासी होते. 12 जून रोजी अहमदाबादमधून उड्डाण केल्यानंतर लंडनला जाणारे बोईंग 787-8 ड्रीमलायनर विमान कोसळलं होतं. आता या अपघातामागचं संभाव्य कारण समोर आलं आहे.

आंतरराष्ट्रीय नागरी उड्डयन संघटनेच्या (ICAO) नियमांनुसार, अपघाताची चौकशी करणाऱ्या राज्यांना अपघाताच्या 30 दिवसांच्या आत प्राथमिक अहवाल सादर करणं हे बंधनकारक असतं. या अहवालामध्ये प्रारंभिक निष्कर्षांची माहिती दिली जाते. अपघातापूर्वीच्या काही क्षणांमध्ये कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये, "विमानाचं इंजिन का कटऑफ केलं?" असं एक पायलट दुसऱ्या पायलटला विचारताना ऐकू येतं, असं या रिपोर्टमधील एका निष्कर्षात असं म्हटलं आहे. मात्र, कोणता आवाज कोणत्या पायलटचा आहे, हे या अहवालात स्पष्ट केलेलं नाही. दोन्ही इंजिन्सच्या फ्यूएलचे स्विचेस हे 'कट-ऑफ' मोडवर करण्यात आले होते, असं या अहवालात म्हटलं आहे.

**अहवालातील काही प्रमुख निष्कर्ष**

विमानाने सुमारे 08:08:42 UTC वाजता 180 नॉट्स IAS चा वेग (नोंद झालेला कमाल वेग) गाठला होता आणि त्यानंतर लगेचच, इंजिन 1 आणि इंजिन 2 चे फ्यूएल कटऑफ स्विचेस (इंधनाचे स्विच) अगदी 01 सेकंदाच्या अंतराने एकामागून एक RUN वरून CUTOFF मोडमध्ये गेले.

या दोन्ही इंजिन्सना इंधन पुरवठा बंद झाल्यामुळे इंजिन N1 आणि N2 ला टेक-ऑफसाठी लागणारा इंधन पुरवठा कमी पडू लागला.

कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये, एक पायलट दुसऱ्याला विचारताना ऐकू येत आहे की, त्यानं इंधन पुरवठा का बंद केला. त्यावर दुसऱ्या पायलटने पहिल्या पायलटला उत्तर दिलं की 'त्यानं असं काहीही केलेलं नाही.'

थोडक्यात, या रिपोर्टमध्ये असं म्हटलं आहे की, फ्लाइट रेकॉर्डरमधील डेटानुसार, दोन्ही फ्यूएल कंट्रोल स्विचेस हे सामान्यतः जमिनीवर असताना इंजिन चालू किंवा बंद करण्यासाठी वापरले जातात. मात्र, अपघाताच्या अगदी काही क्षण आधी, म्हणजेच टेकऑफनंतर हे स्विचेस लगेचच 'रन'वरून 'कटऑफ' स्थितीत हलवले गेले होते. त्यानंतर स्विचेस त्यांच्या सामान्य इनफ्लाइट स्थितीत परत आणले गेले, ज्यामुळे इंजिन पुन्हा कार्यान्वित होण्याची प्रक्रिया आपोआप सुरू होईल.

अहवालानुसार, विमान क्रॅश झालं तेव्हा एक इंजिन पुन्हा कार्यान्वित होण्याच्या प्रक्रियेत होतं, तर दुसरं इंजिन पुन्हा कार्यान्वित झालं होतं, मात्र, त्याला उड्डाणासाठी हवा तेवढा उर्जेचा जोर प्राप्त झालेला नव्हता.

या अहवालाबाबत बोलताना नागरी विमान वाहतूक खात्याचे राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलंय की, " हा प्राथमिक अहवाल आहे. याच्या आधारे आपण कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू शकत नाही. यापूर्वी असे अपघात झाले तर ब्लॅक बॉक्स परदेशात पाठवावा लागायचा. आता आपणच वेगाने हे पूर्ण तपासू शकतो. एआयबी ही स्वतंत्र बॉडी आहे. त्यात मंत्रालयातच काही हस्तक्षेप नसतो. पायलटच्या संभाषणाच्या आधारे काही निष्कर्ष काढता येणार नाही. कारण ते अत्यंत तोकडे संभाषण आहे. पुढची तपासणी आवश्यक आहे. त्या अहवालाची आपण वाट पहावी."

**प्रत्येक सेकंदाला काय घडत गेलं?**

15 पानांच्या या प्राथमिक अहवालात एअर इंडियाच्या या विमानामध्ये उड्डाण झाल्यानंतरच्या काही सेकंदातच काय घडलं होतं, याची माहिती देण्यात आली आहे.

260 जणांचा मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या एअर इंडिया फ्लाईट 171 या विमानाच्या अपघातामागचं संभाव्य कारण या प्राथमिक अहवालातून मांडण्यात आलं आहे.

एअर ॲक्सीडेंट इन्हेस्टीगेशन ब्यूरोच्या या अहवालामधून पायलट्सच्या संभाषणाकडे अधिक ठामपणे लक्ष वेधण्यात आलं आहे. थोडक्यात, हा रिपोर्ट कोणत्याही अंतिम निष्कर्षापर्यंत येत नाही. परंतु, त्यामधून पायलट्सच्या संभाषणाबद्दलचेच अधिक तपशील पुरवले गेलेले आहेत

अहवालानुसार, "विमानाने दुपारी 1 वाजून 38 मिनिट आणि 42 सेकंदांनंतर 180 नॉट्सचा मॅक्सिमम रेकॉर्ड केलेला एअरस्पीड गाठला आणि त्यानंतर लगेचच, इंजिन 1 आणि इंजिन 2 साठी इंधन कट-ऑफ स्विच एका सेकंदाच्या अंतराने 'रन' पोझिशनवरून 'कट-ऑफ' पोझिशनवर हलवलं गेलं."

**"कटऑफ" का केलं?**

कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये, एक पायलट दुसऱ्याला विचारत आहे की त्यानं "कटऑफ" का केलं? दुसऱ्या वैमानिकानं असं म्हटलं आहे की 'त्यानं असं केलेलं नाही.' खरं तर, दोन्ही फ्यूएल कंट्रोल स्विचेस हे सामान्यतः जमिनीवर असताना इंजिन चालू किंवा बंद करण्यासाठी वापरले जातात. मात्र, अपघाताच्या अगदी काही क्षण आधी, म्हणजेच टेकऑफनंतर हे स्विचेस लगेचच 'रन'वरून 'कटऑफ' स्थितीत हलवले गेले होते. यामुळे दोन्ही इंजिनांकडून विमान उड्डाणासाठी पुरवला जाणारा उर्जेचा जोर कमी झाला.

मात्र, कोणता आवाज कोणत्या पायलटचा आहे, हे या अहवालात स्पष्ट केलेलं नाही. विमानाने उड्डाण केलं तेव्हा सह-वैमानिक विमान चालवत होता, तर कॅप्टन निरीक्षण करत होता.

सुमारे 10 सेकंदांनंतर, इंजिन 1 चा इंधन कट-ऑफ स्विच 'कट ऑफ' वरून 'रन' वर गेला. त्यानंतर चार सेकंदांनंतर, इंजिन 2 चा इंधन कट-ऑफ स्विच देखील 'कट ऑफ' वरून 'रन' वर गेला." आता 1 वाजून 38 मिनिट आणि 56 सेकंद झाले होते.

1 वाजून 39 मिनिट आणि 5 सेकंद, म्हणजेच नऊ सेकंदांनंतर, एका पायलटने जमिनीवर असलेल्या हवाई वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना "मेडे, मेडे, मेडे" असा संदेश पाठवला. त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही आणि थोड्याच वेळात त्यांनी विमानाचा अपघात होताना पाहिलं.

## वाचक मनोगत

### महाराष्ट्राच्या अस्मितेचा हेरिटेज सन्मान

दीड वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गड आणि किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करावेत अशी शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनिस्कोकडे केली होती. केंद्रीय सांस्कृतीक मंत्रालयाने युनेस्कोकडे शिफारस केलेल्या या यादीत रायगड, प्रतापगड , साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, सुवर्णगड, पन्हाळगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व तमिळनाडू मधील जिंजी या बारा किल्ल्यांचा समावेश आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनेस्कोकडे केलेली ही शिफारस मान्य झाली असून शिवरायांचे हे १२ किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा युनेस्कोने नुकतीच केली. शिवरायांचे हे बारा किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट होणे ही अभिमानाची बाब आहे. शिवरायांचे हे बारा गड किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान आहे. या घोषणेने जगभरातील मराठी माणसांची छाती फुगली आहे. जगभरातील मराठी जणांसाठी हा सुवर्णक्षण आहे. या क्षणाची प्रतिक्षा मराठी माणूस गेली कित्येक शतके करत होता. शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे मतदान पार पाडले यात अनेक देशांनी भारताच्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांच्या गड किल्ल्यांना हा बहुमान प्राप्त झाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराजांचा ऐतिहासिक ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला. अर्थात हा प्रवास सोपा नव्हता शिवरायांच्या या गड किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी भारताचे एक शिष्टमंडळ गेल्या अनेक महिन्यांपासून कठोर परिश्रम घेत होते. त्यासाठी या शिष्टमंडळाने वीस देशांशी समन्वय साधला. आंतरराष्ट्रीय स्तरावर या शिष्टमंडळाने या गड किल्ल्यांच्या जागतिक वारसा यादीत समावेश का असावा हे पटवून दिले. महाराष्ट्र सरकार, देशाचे सांस्कृतिक मंत्रालय, भारतीय पुरातत्व खाते आणि भारताचे परराष्ट्र मंत्रालय यांचे यासाठी आभारच मानावे लागेल. त्यांच्या एकत्रित प्रयत्नानेच हे साध्य झाले. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना शिवरायांनी हे गड किल्ले बांधले, जिंकले. हे गड किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांची माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. ही माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेच्या आणि युद्ध कौशल्याचा मुत्सद्दीनितीने रचलेला भाग आहे हेच अद्वितीय वैश्विक मूल्य आहे. हे गड किल्ले म्हणजे स्वराज्याच्या शौर्याचे आणि समृद्धीचे प्रतीक आहे. मराठा स्वराज्याचे प्रतीक असलेले हे गड किल्ले सह्याद्रीच्या कुशीत उभारले आहेत. ३०० वर्षापूर्वी बांधलेल्या या गड किल्ल्यांच्या तटबंदीतून मराठा राजवटीच्या सामारिक शक्तीचं दर्शन घडलं. स्वराज्याच्या कुशीतील या गड किल्ल्यांमुळेच शिवरायांना शून्यातून स्वराज्य उभारता आले. स्वराज्याचे वैभव असलेले हे गड - किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट झाले पाहिजे ही मराठी माणसांची प्रामाणिक इच्छा होती. आता मराठी माणसांची ही इच्छा पूर्ण झाली आहे. युनिस्कोने ही शिफारस मान्य केल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास जगभर पोहचेल.

**श्याम ठाणेदार**

## महावितरणच्या अनागोंदीविरोधात मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सातत्याने वीजपुरवठा खंडित होणे, अदानी कंपनीच्या मीटरसाठी सक्ती यामुळे नागरिक त्रस्त झाले असून महावितरणचा गलथान कारभार समोर आला आहे. मात्र नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा जाब विचारण्यासाठी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने कार्यालयावर धडक दिली. यावेळी शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. संतापलेल्या शिवसैनिकांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतल्यानंतर वठणीवर आलेल्या अधिकाऱ्यांनी 30 जुलैपर्यंत सर्व समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. उरण परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित याबाबत होण्याच्या घटना वाढल्या असून ग्राहकांना अदानी ग्राहकांकडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संतापलेल्या शिवसैनिकांनी जिल्हाप्रमुख मनोहर भोईर व उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला. कोटनाका येथील राघोबा मंदिरापासून सुरू झालेला हा मोर्चा थेट महावितरणच्या कार्यालयावर धडकला.

## म्हाडा कोकण मंडळाच्या ५ हजार २८५ घरांची लॉटरी जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** म्हाडाचा विभागीय घटक कोकण मंडळातर्फे विविध गृहनिर्माण योजनेंतर्गत ५ हजार २८५ घरे व ७७ भूखंड विक्रीकरिता लॉटरी जाहीर करण्यात आली आहे. या लॉटरीसाठी १३ ऑगस्ट रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे.

३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता पात्र अर्जाची संगणकीय लॉटरी ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे जाहीर केली जाणार आहे. या लॉटरीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत सोमवार १४ जुलै रोजी दुपारी १ वाजता 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कोकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही लॉटरी पाच घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. २० टक्के सर्वसमावेशक योजनेंतर्गत ५६५ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर गृहनिर्माण योजनेंतर्गत ३००२ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजना व विखुरलेल्या सदनिका आहेत त्या स्थितीत या योजनेंतर्गत १६७७ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेंतर्गत (५० टक्के परवडणाऱ्यास सदनिका) ४१ घरे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेंतर्गत ७७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

या लॉटरीसाठी १३ ऑगस्ट रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. १४ ऑगस्ट रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील.

लॉटरीसाठी स्वीकृत अर्जाची प्रारूप यादी २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. अर्जदारांच्या सोयीकरिता https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज नोंदणी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. लॉटरीसाठी अर्ज भरताना अर्जदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी ०२२ - ६९४६८१०० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाच्या मुख्याधिकारी रेवती गायकर यांनी केले आहे.

**प्रलोभनांना बळी पडू नका**

संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून यामध्ये कोणत्याही प्रकारे मानवीय हस्तक्षेपास वाव नाही. शिवाय या सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ / दलाल / मध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस कोंकण मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही.

## महाराष्ट्रात सत्ताकारण आणि मतदारांचा भ्रमनिरास -सी.आर.म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) :** आज महाराष्ट्रातील,सत्ताकारण हे शुद्ध राजकारणाला तिलांजली देत आहे. सत्ताधीश,आणि विरोधक यांच्या मध्ये एक टोकाचे संघर्ष दिसून येत आहे. दरदिवशी नवनवीन अचंबित करणारा विषय समोर येत आहे. आणि हे एव्हढे भयावह आहे की सर्वच नीतिमूल्ये संपलीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सर्वच राजकारणी नेत्यांनी आपला आदर्श लोकांसमोर ठेवला पाहिजे. पण तसे होईल असे चित्र सध्यातरी नाहीच.माजी पंत प्रधान लाल बहादुर शास्त्री,माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम

यांच्या जीवन शैलीचा कणभर जरी नवीन राजकारण्यांनी आदर्श घेतला तरी खूप.पण आज सत्ता पैसा पुन्हा सत्ता असे समीकरण झाले आहे.भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्या विभूतींनी आपले आयुष्य संपविले त्यांची जरी या राजकारण्यांनी आठवण केली तरी त्यांच्या आत्म्याला समाधान लाभेल

देश हा देव असे माझा असे मानणारे राजकारणी संपत चालले आहेत आत्ता पैसा हा देव असे माझा.. कटू पण सत्य आहे.अशी माहिती वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी दिली.

निवडणुकीतील बदल पूर्वी जनता लोकवर्गणी काढूनआपला नेता निवडायचे, तो निस्वार्थी,विद्वान, स्वच्छ प्रतिमा असलेला,२४ तास काम करणारा असायचा आत्ता मात्र यात आमूलाग्र बदल झाला,अमाप खर्च करणारा,कुबेर असणारा नेता आपोआप निवडला जातो हे सांगण्याची गरज नाही.महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्षाचे सांगोळ्याचे आदर्श आमदार गणपतराव देशमुख तब्बल ११ वेळा निवडून आले, ना सत्ता, ना पैसा तरी लोकांचा नेता, आज तशे चित्र नाहीच. साध्या लाल परीने प्रवास करणारा आमदार आज दाखवा .हे खरे हाडाचे नेते.आज मात्र गळयात सोन्याचे दोरखंड ,सर्व बोटांचे मान ठेवणाऱ्या सोन्याच्या ,ग्रहांच्या ,हिऱ्यांचा अंगठ्या काही प्रतिनिधीच्या बोटात दिसतात.महागड्या गाड्या, आलिशान बंगले,करोडोची मालमत्ता नेत्यांची असते, मात्र खरी देशसेवा करण्यासाठी जे लोक प्रतिनिधी असतात त्यांना मात्र हे चित्र घातक ठरते.आता विधान भवनात,विधान परिषदेत सर्व चित्र लोकांपर्यंत पोहचते त्यामुळे लोकांचा भ्रमनिरास झाल्याशिवाय राहत नाही.मंत्री पद वाद,पालक मंत्री वाद ,निधी उपलब्ध नाही म्हणून नाराजी, हे चित्र आहे.महान राष्ट्र तो महाराष्ट्र मात्र वेगळीच प्रसिद्धी आज आपल्या राज्याला मिळत आहे.वेळोवेळी दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा अशी ओळख धूसर तर होत नाही ना? हा प्रश्न निर्माण होत आहे.महाराष्ट्रात नेत्यांचे कमी कपड्यातील फोटो ,मारामाऱ्या करणारे फोटो,शिवीगाळ करणारे फोटो पाहिल्यावर नवीन पिढी काय बोध घेणार.राजकारण म्हणजे एकदम ओके नाही..राजकारणी वैयक्तिक टिपणी न करता प्रत्यक्ष कुटुंबाला टार्गेट करतात ही महाराष्ट्राची संस्कृती नाही.अगदी चुली पर्यंत पोहचतात.आणि या राजकारणाची अब्रु वेशीवर टांगतात.राजकारणी कसे असावे तर सत्ता नसताना शिक्षण संस्था निर्माण करून गरिबांच्या ,दलितांच्या ,अनाथांचा मुलांना शिक्षणाची सोय केली,अनेकांना नोकऱ्या दिल्या, खेडोपाडी शाळा काढल्या,ते लोकनेते दत्ता पाटील,कर्मवीर भाऊराव पाटील,

रयत शिक्षण संस्था,कोकण एज्युकेशन सोसायटी,स्वामी विवेकानंद संस्था,अशा संस्था निर्माण केल्या त्या संस्थापकाना सलाम.आज मात्र ही चित्र बदलले आहे देणग्या गोळा करा आणि शाळा काढा यामुळे पैशाचे व्यवहार सुरू होत आहेत.यातून सामान्य कुटुंब शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका भविष्यात असेल हे नक्कीच.थोडक्यात असे राजकारणी निर्माण व्हावेत ते समाजहित जोपासणारे,समाजात बॉडीगार्ड घेऊन फिरणारे नसावेत, कारण या नेत्यांची एक फळी दुय्यम असते ती नेत्यांपर्यंत पोहचू देत नाही,कर नाही त्याला डर कशाला.पण तशे होणार नाही.माझा नेता सर्वांचा अभिमान असे वाटले पाहिजे..स्वच्छ प्रतिमा असणारा मोजकी संपत्ती असणारा,साधी राहणी उच्च विचार असणारा उच्च शिक्षित ,समाजाप्रती दायित्व असणारा असावा तरच देशाचे ,राष्ट्राचे भविष्य उज्वल होईल अशी प्रार्थना करतो.असेही सांगितले.

## डोंबिवलीतील खड्डेमय रस्त्यात वृक्षारोपण
### ठाकरेंच्या शिवसेनेचे लक्षवेधी आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली :** शहरात जरी मोठ्या प्रमाणावर सिमेंट काँक्रीटीकरण माध्यमातून रस्ते झाले असले तरी काही मुख्य जुने रस्ते आजही डांबरी आहेत. अशा डांबरी रस्त्यांवर पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने त्या रस्त्यावर खड्डेच खड्डे दिसतात. शहरातील लोकांना याचा मोठा त्रास होत आहे. स्थानिक प्रतिनिधींच्या कार्यालयात या समस्येच्या तक्रारी येत आहे. पालिका अधिकारी याकडेही लक्ष देत नाहीत अखेर रविवारी शिवसेना ठाकरे पक्षाने त्या खड्डेमय रस्त्यात झाडे लावून प्रशासनाचा निषेध केला

पश्चिमेकडील सुभाष रोड खड्डेमय झाल्याने वाहनचालकांचा अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली डोंबिवली पश्चिम शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे यांच्या उपस्थितीत विधानसभा अधिकारी आदित्य पाटील, सांस्कृतिक अधिकारी मिलींद दुडवडकर, उपशहरप्रमुख संजय पाटील आणि श्यामराव चौगुले, विभाग प्रमुख राजेंद्र सावंत, विभाग अधिकारी अनिल मुथा, शाखाप्रमुख तुषार नाईक ओमकार पांचाळ, वराडकर, कार्यालयप्रमुख ( डोंबिवली पूर्व ) नारायण गायकवाड, कैलास सणस, प्रवीण साळवी यांसह अनेक शिवसैनकांनी सुभाष रोडवरील रस्त्यातील खड्डयात झाडे (रोप) लावले.

याविषयी डोंबिवली पश्चिम शहरप्रमुख तेलगोटे म्हणाले, प्रशासन लक्ष देत नसल्याने त्यांना जागे करण्याकरता आम्ही हे निषेध आंदोलन केले असून आता तरी प्रशासनाने जागे व्हावे, अपघात झाल्यावर खड्डे बुजविणार का? असा प्रश्नही उपस्थित केला. स्थानिक नागरिक आमच्या शाखेत रस्त्याच्या खड्डयाबाबत तक्रारी घेऊन येतात. हे काम प्रशासनाचे आहे, प्रशासनाने याकडे गंभीयाने लक्ष दिले पाहिजे. जर यानंतरही पालिका अधिकाऱ्यांना जाग आली नाही तर उग्र आंदोलन करू असेही तेलगोटे म्हणाले

## शाळकरी मुलीने उधळला स्वतःच्या अपहरणाचा डाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडीतील एका शाळकरी मुलीने स्वतःच्या अपहरणाचा डाव मोठ्या हिमतीने उधळला. रिक्षाने शाळेत जात असताना या विद्यार्थिनीला तिच्या शाळेजवळ न थांबवता रिक्षाचालक व त्याच्या साथीदाराने पळवण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात येताच या बहाद्दर मुलीने प्रसंगावधान दाखवत दप्तरातील कंपास पेटीतून करकटक काढले आणि बाजूला बसलेल्या अपहरणकर्त्याला रिक्षातून ढकलून दिले. त्यानंतर रिक्षाचालकावर करकटकने हल्ला करत धावत्या रिक्षातून उडी मारून स्वतःची सुटका करून घेतली. स्वसंरक्षणासाठी प्राणपणाने मुकाबला केलेल्या या विद्यार्थिनीचे कौतुक होत आहे. याप्रकरणी भिवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून नराधमांच्या शोधासाठी सर्च ऑपरेशन सुरू केले आहे.

## ठाणे जिल्ह्यात मुदतबाह्य खाद्यपदार्थांची विक्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

एक्स्पायरी डेट संपल्यानंतर संबंधित मालाची विल्हेवाट न लावता बाजारात विक्री केली जात असल्याचा प्रकार ठाणे जिल्ह्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी ठाणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून सुमारे 200 टन माल हस्तगत केला आहे. या मालाची किंमत सुमारे 30 लाख रुपये आहे.

गुन्हे शाखेने अटक केलेल्या आरोपींमध्ये साकीनाका येथील इरफान चौधरी आणि भिवंडी येथील अक्रम शेख यांचा समावेश आहे. फ्लिपकार्ट कंपनीने एक्स्पायरी डेट संपलेले कडधान्य, आटा, ड्रायफ्रुट्स, साखर, चॉकलेट, कॉस्मेटिक, सॅनेटरी प्रॉडक्ट्स असा माल शीळ-डायघर येथील इको स्टार रिसायकलिंग या कंपनीत विल्हेवाट लावण्यासाठी पाठवला होता. मात्र दोन्ही आरोपी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या मालाची विल्हेवाट न लावता तो पुन्हा विक्रीसाठी बाजारात आणला. भिवंडी शहरात या मालाची विक्री सुरू केली.

एक्स्पायरी डेट संपलेला हा माल ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आरोपींनी कंपनीच्या बनावट डिलिव्हरी चलनाचा वापर केला. या मालाची भिवंडी परिसरात मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर गुन्हे शाखेने शीळ-डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केली. या आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना येत्या सोमवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायाधीशांनी दिले आहेत.



**सोमवार १४ जुलै २०२५**

**मेष**
विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. व्यवसायाला पुढे नेण्यासाठी काही योजना कराव्या

**वृषभ**
आज धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यात व्यस्त असाल. समर्पण आणि मेहनतीचे फळ मिळेल.

**मिथुन**
परिश्रमाचे खूपच चांगले परिणाम तुम्हाला मिळतील. यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कर्क**
आज तुम्हाला कुटुंबाकडून पूर्ण सहकार्य मिळेलघरामध्ये धार्मिक कार्य करण्याचे बेत आखता येतील.

**सिंह**
आज आपण मित्रांसोबत फोनवर बोलण्यात वेळ घालवू नका. लव्हमेट एकत्र वेळ घालवतील.

**कन्या**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज कुठेतरी अडकलेले पैसे परत मिळतील. प्रसन्नता दिसेल.

**तूळ**
आज तुम्ही तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी काही नवीन योजना आणि गुंतवणूक कराल

**वृश्चिक**
नातेवाईकाच्या आगमनामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. मिष्ठान्न भोजनाचा आस्वाद घ्याल.

**धनु**
कुठेतरी बाहेर जाऊ शाक्ता, आर्थिक स्थिती मजबूत होईल. नियोजित महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण होतील.

**मकर**
वैवाहिक जीवनात गोडवा राहील. एखादी चांगली बातमी मिळाल्या तुमचे मन दिवसभर प्रसन्न राहील.

**कुम्भ**
आज तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. कुटुंबासाठी थोडा आज वेळ काढावा लागेल.

**मीन**
आज काही कामात खूप व्यस्त असाल. इतरांचा कोणताही सल्ला तुमच्यासाठी फायदेशीर असेल.

### १४ जुलै दिनविशेष

१८५६ : थोर समाजसुधारक तसेच केसरीचे पहिले संपादक गोपाल गणेश आगरकर यांचा टेंभू कराड येथे जन्म.
१८८४ : महानुभाव वाङ्मयाचे नामवंत संशोधक यशवंत खुशाल देशपांडेंचा जन्म.
१९२० : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचा जन्म
१९७५ : संगीतकार मदनमोहन यांचे निधन.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY


7038658191
9130580111

# नवी मुंबई विमानतळावरून सप्टेंबर अखेरीस उड्डाणाची शक्यता



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नामांतराच्या मुद्द्यावरून गाजलेल्या बहुप्रतीक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनाला अखेर मुहूर्त सापडला आहे. देशातील सर्वात आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आले असून येत्या ३० सप्टेंबरपर्यंत हे विमानतळ प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.

> **या भव्य प्रकल्पाच्या उभारणीत दररोज १३ ते १४ हजार कामगार झटत असून, ते दिवसरात्र मेहनत घेत आहेत. या विमानतळाचे दोन्ही रनवे पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यावर वर्षाला तब्बल ९ कोटी प्रवाशांसाठी सेवा देता येणार आहेत. मुंबई विमानतळाच्या तुलनेत हे विमानतळ अधिक विस्तृत आणि आधुनिक असेल**
>
> ● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगतिपथावरील कामाची पाहणी मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी केली.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जगातील सर्वात जलद 'बॅग क्लेम सिस्टिम' विकसित करण्यात यावी, हे या विमानतळावरील प्रमुख वैशिष्ट्य असावे, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना दिली. सद्यस्थितीत विमानतळाचे काम ९४ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित सहा टक्के काम सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करून पहिले प्रवासी विमान उडणार, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या विमानतळाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते आणि त्याचे उद्घाटनही आता त्यांच्याच हस्ते होणार आहे, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली.

विमानतळावरील कामांची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रकल्पाच्या सद्यःस्थितीविषयी माहिती दिली. ते म्हणाले की, "नवी मुंबई विमानतळ हे केवळ एक प्रवासाचे ठिकाण न राहता, हे 'फ्युचर रेडी' एअरपोर्ट असेल. इथे प्रवाशांना बॅगेज ट्रॅकिंगसाठी ३६० डिग्री बारकोड स्कॅनिंगची सुविधा असेल. जगातील सर्वात वेगाने प्रवास करणाऱ्या बॅगेज सिस्टीमपैकी एक याठिकाणी कार्यान्वित केली जाणार आहे. विमानतळावर एक किमीपर्यंत चालण्याऐवजी 'ट्रॅव्हलर' सुविधा' (ऑटोमेटेड वॉकवे) देण्यात येणार आहे, जेणेकरून वयोवृद्ध आणि दिव्यांग प्रवाशांना कोणतीही अडचण भासणार नाही."

या भव्य प्रकल्पाच्या उभारणीत दररोज १३ ते १४ हजार कामगार झटत असून, ते दिवसरात्र मेहनत घेत आहेत. या विमानतळाचे दोन्ही रनवे पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यावर वर्षाला तब्बल ९ कोटी प्रवाशांसाठी सेवा देता येणार आहेत. मुंबई विमानतळाच्या तुलनेत हे विमानतळ अधिक विस्तृत आणि आधुनिक असेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# मिरा-भाईंदर शहरात अमली पदार्थ विक्रेत्यांचा सुळसुळाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात सर्रासपणे अमली पदार्थ विक्रेत्यांचा सुळसुळाट होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पोलिसांकडे केली आहे. मिरा भाईंदर शहरात ही अमली पदार्थ तस्करी होण्याचे प्रकार वाढू लागले आहे. काही दिवसांपूर्वी हटकेश येथील 'माफिया' नावाच्या क्लबजवळ अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या संशयितांना काशिगाव पोलिसांनी अटक केली होती. मात्र, अवघ्या दोन तासांतच कोणतीही ठोस कारवाई न करता या संशयितांना मुक्त करण्यात आल्याची माहिती समोर आली होती.

या संदर्भात स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर, शनिवारी मंत्री सरनाईक यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट दिली. या प्रसंगी त्यांनी सांगितले, "मिरा-भाईंदर हे झपाट्याने विकसित होणारे शांतताप्रिय शहर आहे. येथे जर खुलेआम अमली पदार्थांचा व्यवहार चालू असेल, तर हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. अशा प्रकारांना रोखण्यासाठी कठोर पावले उचलली जातील. संबंधित आरोपींवर 'मोका' अंतर्गत कारवाई करण्यात यावी आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलिसांवरही चौकशी करून कारवाई केली जावी," अशा सूचना सरनाईक यांनी पोलिसांना केल्या आहेत.

# पालघर जिल्ह्यात वीस हजार शालेय पासिकांचे वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेषतः विद्यार्थिनींसाठी असलेल्या विविध पास योजनांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जून महिन्यात जिल्ह्यात तब्बल २० हजार शालेय पासचे वाटप पूर्ण झाले असून यामध्ये अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत मोफत पास मिळाल्याने विद्यार्थिनींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

एसटीचे पास थेट शाळेत मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास वाचला आहे. १६ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा सुरू झाल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के सवलत दिली आहे, म्हणजेच केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. या अंतर्गत ३,६४५ विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी पास वितरित केले.

# नवी मुंबईत एकाच रात्रीत ५ दुकाने लुटली

## उलढत ची तोडफोड; व्यापाऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल तालुक्यातील उलवे नोडमध्ये एकाच रात्रीत पाच दुकाने फोडून अज्ञात चोरट्यांनी हजारोंच्या मालावर हात साफ केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. ही घटना उलवे सेक्टर-23 भागातील असून, स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. उलवे पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपासाची चक्रे फिरवली जात आहेत.

गुरुवारी (दि. 10 जुलै) रोजी रात्रीच्या सुमारास ही चोरी झाली. उलवे सेक्टर-23 भागात नीरज सोनी यांचे मोबाईल दुरुस्तीचे दुकान आहे. सोनी यांनी रात्री 10 वाजता नेहमीप्रमाणे दुकान बंद केले व घरी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या शेजारच्या एका दुकानदाराने फोन करून त्यांच्या दुकानाचे कुलूप तुटलेले असल्याचे कळवले. सोनी दुकानात आले असता, दुकानातील अनेक मोबाईल, ॲक्सेसरीज व काही रोख रक्कम चोरीला गेल्याचे आढळून आले. त्यांनी तात्काळ उलवे पोलिसांना माहिती दिली.

उलवे पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. प्राथमिक चौकशीत असे आढळले की, केवळ सोनी यांचेच नव्हे तर इतर चार दुकानांमध्येही चोरी झाली होती. एकच टोळी ही पाच दुकाने फोडून गेलेली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# विद्यार्थ्यांना ताट धुण्यास लावले !

## पनवेलमध्ये मुख्याध्यापिका निलंबित, शिक्षण अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

### पनवेल महापालिकेच्या शाळेतील संतापजनक प्रकार

**ताटे शौचालयात लागलेल्या बेसिनमध्ये धुतली जात असल्याने आरोग्याच्या दृष्टीने मोठा धोका निर्माण होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी होणारा हा खेळ योग्य आहे का? असा प्रश्न पालकांकडून विचारला जात आहे. पनवेल महानगरपालिकेच्या श्री गणेश विद्यामंदिर शाळा क्रमांक ६, धाकटा खांदा येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना शौचालयाजवळील बेसिनमध्ये स्वतःची ताटे धुवावी लागत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यामुळे शिक्षण व्यवस्थेतील ढिसाळपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.**





### हलगर्जीपणा खपवून घेणार नाही - आयुक्त मंगेश चितळे

**मनपा शाळेत घडलेला प्रकार हा गंभीर असून तो मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे घडला आहे. यापुढे असा हलगर्जीपणा कोणत्याही शाळेत खपवून घेतला जाणार नाही. लहान मुलांबाबत सर्वच शाळांतील शिक्षक आणि अन्य यंत्रणांनी जागरूक राहावे. जर असा प्रकार पुन्हा घडला तर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे, असा इशाराही महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिला आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

लहान विद्यार्थ्यांना जेवणाचे ताट आणि डबे धुण्यास लावल्याचा संतापजनक प्रकार पनवेल शहरातील श्रीगणेश विद्या मंदिर शाळा क्रमांक 6 मध्ये घडला आहे. याची गंभीर दखल घेऊन पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेला तत्काळ निलंबित केले आहे. महापालि का शाळेत हा प्रकार घडल्यामुळे शिक्षण अधिकाऱ्यांनाही कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आल्याने शिक्षण विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांची पळापळ उडाली आहे. पनवेल महापालिका अंतर्गत असलेल्या या शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे जेवणाचे ताट आणि डबे धुण्यासाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. या कामाचा ठेका प्रशासनाने अक्षयपात्र या संस्थेला दिला आहे. मात्र महापालिकेच्या श्रीगणेश विद्या मंदिर शाळा क्रमांक 6 मध्ये जेवणाचे ताट व डबे विद्यार्थ्यांकडून धुऊन घेतले जात होत होते. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर महापालिका आयुक्तांनी शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन हिलम यांना तत्काळ निलंबित केले, तर पनवेल महापालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली. विद्यार्थ्यांचे जेवण झाल्यानंतर त्यांचे ताट आणि डबे धुण्यासाठी या शाळेत काही आया ठेवण्यात आल्या आहेत. या आयांची तातडीने बदली करण्यात यावी अशा सूचनाही आयुक्तांनी अक्षयपात्र संस्थेला दिल्या आहेत.

---

### दोन मावश्या असतानाही विद्यार्थी ताट धुवत आहेत?

शाळेत पनवेल महानगरपालिकेने दोन मावश्या नियुक्त केल्या आहेत. मात्र, या मावश्या ताट धुण्याचे काम करत नसल्याने लहान मुलांनाच आपल्या हाताने ताटे धुवावी लागत आहेत. विशेष म्हणजे ही ताटे शौचालयात लागलेल्या बेसिनमध्ये धुतली जात असल्याने आरोग्याच्या दृष्टीने मोठा धोका निर्माण होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी होणारा हा खेळ योग्य आहे का? असा प्रश्न पालकांकडून विचारला जात आहे.

# सरकारी रुग्णालयांमधील परिचारिकांना मिळणार संरक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. १३ :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या परिचारिकांनाही तीन पाळ्यांमध्ये सुरक्षा पुरवली जाणार आहे. अमरावती येथे नुकत्याच झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सेवा संचालनालयाने परिचारिकांना सुरक्षा पुरवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी महाराष्ट्र सुरक्षा दलाकडे सोपविण्यात येईल.

अमरावती जिल्हा रुग्णालयात रुग्णाच्या कुटुंबीयांनी एका परिचारिकेवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर सरकारी रुग्णालयांमधील परिचारिकांच्या सुरक्षेचा मुद्दा तापला. सुरक्षेची मागणी करीत परिचारिका संघटनांनी मुंबईतील आरोग्य भवनात आरोग्य सेवा संचालनालयाच्या संचालकांची भेट घेतली. या बैठकीत संस्थेच्या अधिकाऱ्यांनी परिचारिकांना सुरक्षा देण्याचा आग्रह धरला. त्यानंतर राज्यातील सर्व जिल्हा, उपजिल्हा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये काम करणाऱ्या परिचारिकांना तीन शिफ्टमध्ये काम करायला लावण्यात आले.

प्रत्येक वॉर्डच्या बाहेर सुरक्षारक्षक महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे महासचिव सुमित्रा तोटे म्हणाल्या, की वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या परिचारिकांना आधीपासून सुरक्षा दिली जाते. परंतु सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या ४० हजार परिचारिकांच्या सुरक्षेचा प्रश्न प्रलंबित होता. अमरावतीमध्ये परिचारिकेवर झालेल्या हल्ल्यानंतर संघटनांनी परिचारिकांच्या सुरक्षेबाबत आक्रमक भूमिका स्वीकारली होती. अखेर प्रशासनाने ते गांभीर्याने घेतले.

# मुंबई-पुणे प्रवासाचा वेळ कमी होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. या प्रकल्पतील एक बोगदा देशातील सर्वात लांब बोगदा असून या प्रकल्पामुळे पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ अर्धा तासाने कमी होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पच्या कामाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार बाळा भेगडे, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सह व्यवस्थापकीय संचालक मनुज जिंदल, राजेश पाटील मुख्य अभियंता राजेश निघोट, अधीक्षक अभियंता राहुल वसईकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई- पुणे या महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे हे अंतर कमी होणार असल्याने प्रवाशांना याचा फायदा होणार आहे. महामार्गावरील घाट असलेला भाग या प्रकल्पामुळे टाळता येणार असून घाटमार्गामुळे होणारा वाहतूक अडथळा दूर होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या महामार्गावर आरामदायी प्रवास होणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने या प्रकल्पाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. या प्रकल्पाचे एकूण ९४ टक्के काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत प्रकल्पाचे काम करणारे अभियंते आणि कामगारांचे कौतुक केले.



शिवरायांच्या गडकिल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश

# डोंबिवली पूर्वेला भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष

डोंबिवली :: शरद शहाणे

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रातील 11 किल्ले आणि तमिळनाडूतील जिंजी किल्ला अशा 12 किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळाला आहे. ही संपूर्ण भारता साठी आनंदाची आणि स्वाभिमानाची घटना आहे.शनिवार दिनांक 12 जुलै 2025 रोजी सायंकाळी सहा वाजता भारतीय जनता पार्टीतर्फे डोंबिवली पूर्वेकडील स्वर्गीय इंदिरा गांधी चौकात, जल्लोष करण्यातआला. यावेळी फटाके आणि ढोल ताशांच्या आवाजात परिसर दुमदुमूनगेला सर्वांनी एकमेकाला पेढे भरून आपला आनंद व्यक्त केला महिलांनी फुगड्या घालून आपला आनंद व्यक्त केला.या जल्लोषात भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्हाध्यक्ष, नंदकिशोर घनश्याम परब, डोंबिवली पूर्व मंडल अध्यक्ष मितेश पेंडकर, महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती सरचिटणीस, शशिकांत कांबळे सर्व पदाधिकारी महिला मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# उच्च न्यायालयाचे बदलापूर पालिकेला फटके

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. १३ :** शहरातील एका व्यक्तीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यानुसार आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. कुळगाव-बदलापूर नगरपालिका क्षेत्रात गटार व्यवस्था आणि सांडपाणी सुविधांच्या बाबतीत कोणतीही व्यवस्था नाही. तसेच सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट उल्हास नदीत सोडण्यात येत आहे. याबाबत उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करीत हे अत्यंत धोकादायक असल्याचे म्हटले आहे. तसेच बदलापूर नगरपालिकेला उच्च न्यायालयाने खडे बोल सुनावत लवकरच या संदर्भातील अहवाल सादर करण्याचे निर्देशदेखील दिले आहेत.

# एमआयडीसी जलवाहिनीवरून गढूळ पाणी पुरवठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**डोंबिवली -** डोंबिवली एमआयडीसीतील मिलापनगर परिसरात एमआयडीसीच्या जलवाहिनीवरून गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने रहिवासी त्रस्त झाले आहेत. पालिका हद्दीत डेंग्यु, मलेरिया, टॉयफॉईड आणि इतर साथ आजारांनी डोके वर काढले असतानाच, घरात एमआयडीसीकडून गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने हा पुरवठा तातडीने बंद होईल यादृष्टीने एमआयडीसी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे.

एमआयडीसीतील मिलापनगर भागातील रहिवाशांच्या घरात शुक्रवारी अचानक गढूळ पाण्याचा पुरवठा सुरू झाला. सुरूवातीला दूषित पाण्याचा पुरवठा आपल्याच घरात होत आहे असे नागरिकांना वाटले. यामुळे रहिवाशांनी जलवाहिन्यांची तपासणी केली. त्यांना जलवाहिन्या कोठेही फुटल्या नसल्याचे आणि त्यात दूषित पाणी जात नसल्याचे निदर्शनास आले. प्रत्येक घरात गढूळ पाण्याचा पुरवठा झाल्याने मिलापनगर भागातील रहिवाशांनी समाज माध्यमांवर आपली नाराजी व्यक्त करण्यात सुरूवात केली. त्यावेळी एमआयडीसीच्या मिलापनगर परिसराला एमआयडीसीकडून गढूळ पाण्याचा पुरवठा झाल्याचे रहिवाशांच्या निदर्शनास आले. जागरूक रहिवाशांनी ही माहिती तात्काळ एमआयडीसीच्या डोंबिवलीतील अधिकाऱ्यांना दिली. एमआयडीसीतील अनेक घरांमध्ये एमआयडीसीकडून पाणी पुरवठा करण्यात येतो. काही बंगलेधारकांनी जलसाठा करण्याची व्यवस्था केली नाही. त्यामुळे त्यांच्या घरात थेट पाणी येते. त्यांना या दूषित पाण्याचा सर्वाधिक त्रास झाला. ज्या इमारती, बंगल्यांवर पणी साठवण टाक्या आहेत. त्या टाक्यांमध्ये दूषित पाणी आले. एमआयडीसी अधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेतली आहे.

एमआयडीसी हद्दीत सतत नवीन काँक्रीट रस्त्यांचे खोदकाम, सेवा वाहिन्या टाकण्यात ठेकेदाराकडून एमआयडीसीच्या भूमिगत जलवाहिन्या फोडल्या जातात. हादरा बसलेल्या जलवाहिन्यांमध्ये हळूहळू पावसाचे, बाजुच्या गटाराचे पाणी घुसून ते पाणी नागरिकांच्या घरात येते, अशी माहिती एमआयडीसीतील काही स्थानिकांनी दिली. साथ आजारांनी शहरात डोके वर काढले असताना त्यात दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने रहिवाशांनी बाजारातून पाणी विकत आणून त्याचा स्वयंपाक आणि पिण्यासाठी वापर सुरू केला आहे.



दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता



ठाणे ■ सोमवार ■ १४ जुलै २०२५

jeevandeepvartanews2020@gmail.com




# ईडीच्या कारवाईविरोधात सक्षमपणे लढणार – रोहित पवार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आम्ही न्यायप्रक्रियेवर विश्वास ठेवतो आणि न्याय मिळेल, याबाबत आम्ही आश्वस्त आहोत. मी काहीही चुकीचं केलं नाही. मला कोणतीही भीती नाही. आम्ही पळून जाणाऱ्यांपैकी नाही. आम्ही लढणार आहोत, असा ठाम निर्धार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शप गट) आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी 'ईडी'ने राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप) चे आमदार रोहित पवार यांना आरोपी बनवले. त्यावर प्रतिक्रिया देताना पवार म्हणाले की, मी काहीही चुकीचे केले नाही आणि त्यांना राजकीय हेतूंनी लक्ष्य केले जात आहे. एफआयआरमध्ये ९७ जणांची नावे असतानाही केवळ मला लक्ष्य केलं जात आहे. आता ही बाब न्यायालयात आहे. मी कायदेशीर लढाई लढणार असून ती जिंकणार आहे, असा दावा त्यांनी केला. ईडीने मुंबईच्या विशेष न्यायालयात एमएससीबी घोटाळ्याच्या आरोपपत्रात कर्जत-जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांना आरोपी ठरवले आहे.

## मुरबाड मधील शेतकऱ्यांच्या खात्यात बोनसचे पैसे जमा !

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुरबाड :: दिलिप पवार**

मुरबाड तालुका शेतकरी संघ यांनी सन २०२० २१. मध्ये ५०० शेतकऱ्यांचे खरेदी केलेल्या भाताचे बोनसचे पैसे मिळाले नव्हते . या शेतकऱ्यांचे भात खरीपात घेतले होते मात्र त्याची नोंदणी जुन महिन्यात रब्बीत केली होती सर्वर डाऊन प्रकिये मुळें त्यांची नोंदणी रब्बीत झाली होती . या शेतकर्यांना सर्वांनी दुर्लक्षित केले होते मात्र समाजसेवक रमेश हिंदुराव यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांना सोबत घेऊन डिंसेबर २०२२ पासुन पत्र व्यवहार व उपोषणे केली . हिवाळी अधिवेशन नागपुर , आझाद मैदान मुंबई, तहसिल कार्यालय मुरबाड, या ठिकाणी शेतकऱ्यांना सोबत घेऊन १३ वेळा उपोषण केले . प्रत्येक वेळी संबधीत विभागाकडून लेखी आश्वासन घेतले. या शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी मुरबाड विधानसभेचे किसन कथोरे, आमदार संजय केळकर यांनी उन्हाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता . यासाठी मंत्री महोदय, अन्न नागरी पुरवठा सचीव , महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन, ठाणे जिल्हा मार्केटिंग अधिकार, मुरबाड तहसीलदार यांचेकडे सातत्याने पाठपुरावा केला . आज ५०० पैकी ४७६ शेतकऱ्यांचे पैसे त्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. या आंदोलनात तालुक्यातील शेतकरी व सहकारी मित्र यांनी पांठीबा दिल्यामुळेच आपण हे यश प्राप्त करू शकलो असे लोकमित्र रमेश हिंदुराव यांनी सांगितले . ज्यांनी हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी पत्रकार . लोकप्रतिनिधी, विविध संघटना .पक्ष सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी ,प्रशासन तसेच खरेदी विक्री संघांचे नविन प्रशासकीय संचालक मंडळ यांनी मदत केली त्या सर्वांचे आभार मानले आहेत.

## मुंब्रा-शिळ परिसरातील २१ अनधिकृत इमारती जमीनदोस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंब्रा-शिळ परिसरातील खान कंपाऊंडमधील २१ अनधिकृत इमारती उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने अखेर जमीनदोस्त केल्या असून, या संपूर्ण क्षेत्राला 'ग्रीन झोन' म्हणून विकसित करण्यास सुरुवात झाली आहे. महापालिकेने येथे वृक्ष लागवड सुरू केली असून, टप्प्याटप्प्याने संपूर्ण परिसर हरित बनवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. गेल्या काही वर्षांपासून खान कंपाऊंड परिसरात झपाट्याने अनधिकृत बांधकामे उभी राहत होती. ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने उच्च न्यायालयाच्या आदेशावर आधारित कारवाईस १३ जूनपासून सुरुवात केली. गट क्रमांक १७८, १७९ आणि १८० या भागात उभारलेल्या १७अनधिकृत इमारतींवर पहिल्या टप्प्यात कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान काही रहिवाशांनी न्यायालयात धाव घेतली. मात्र, न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार देत, संबंधित रहिवाशांना २३ जूनपर्यंत जागा रिकामी करण्याची मुदत दिली. मुदत संपल्यानंतर उर्वरित इमारतींवरही कारवाई करण्यात आली.

## भाजपा डोंबिवली ग्रामीण कार्यालयात नव्या कार्यकारिणीसह मोठे पक्षप्रवेश

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●







**डोंबिवली ✍ शरद शहाणे**

भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर घनश्याम परब यांच्या यांच्या जनसंपर्क कार्यालयात दिनांक 12 जुलै 2025, सकाळी 11 वाजता भारतीय जनता पार्टी डोंबिवली ग्रामीण विभागात नवीन कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश आणि वॉर्ड क्रमांक 85 ची, नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब यांच्या अध्यक्षतेखाली आणि मंडल अध्यक्ष करण जाधव युवा मोर्चा सरचिटणीस संदीप शर्मा यांच्या उपस्थितीत वार्ड क्रमांक 85 ची नवीन कार्यकारणी आणि नवीन कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम संपन्न झाला.वार्ड क्रमांक 85 चे अध्यक्ष प्रशांत अर्जुन कोल्हे, वार्ड क्रमांक 85 च्या महिला अध्यक्षा, सौ. मनीषा हर्षद चोणकर, युवा मोर्चा अध्यक्ष संकेत बेर्डे यांची पदनियुक्ती करण्यात आले. दरम्यान या कार्यक्रमात नवनिर्वाचित कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला यामध्ये नीलम सामोता, जानवी मोहिते, दिपाली कोलसे, सुमन राजभर, अमित नांदगावकर, चारुदत्त पाटील ,अशा अनेक नवीन कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

दरम्यान जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब यांनी सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना भारतीय जनता पार्टीचे ध्येय धोरण समजावून सांगितले, पक्षाची शिस्त आणि आपली जबाबदारी सगळ्यांनी काटेकोरपणे पाळली पाहिजेत , दरम्यान सर्व कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## भातसई जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**शहापूर ग्रामीण ✍ नरेंद्र पाटील**

वासिंद हनुमान कॉलनी येथील One step for Education या सेवाभावी संस्थेने नुकतेच वाशिंद जवळील भातसई येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

वन स्टेप फॉर एज्युकेशन ही संस्था गेल्या अनेक वर्षापासून स्तुत्य उपक्रम राबवित असून अनेक गोरगरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी संस्थेच्या वतीने शैक्षणिक मदत करीत असते नुकताच भातसई येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून एक स्तुत्य उपक्रम संस्थेच्या वतीने राबवण्यात आला यावेळी समाजसेवक दिनेश वेर्लेकर यांची सुकन्या नेहा वेर्लेकर, प्राध्यापक श्याम पाटील आदित्य देवधर, पारस पाटील, आनंद नाईक, मधुकर झोले , हे संस्थेचे सदस्य उपस्थित होते . याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा चंद्रकला खारीक, शिक्षणतज्ञ सुखदेव जाधव, निलिमा माळी मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्व पटवून देऊन आपण शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन आपल्या गावाचं आपल्या शाळेचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे नाव रोषण केले पाहिजे यासाठी आपण प्रचंड मेहनत घेतली पाहिजे हे मान्यवर पाहुण्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे नियोजन व बहारदार सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक मनोहर मडके यांनी केले.

## पेण तालुका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची सभा संपन्न

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**पेण (प्रतिनिधी) :** अखिल पेण तालुका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची मासिक सभा प्राथमिक शिक्षक पतपेढी पेण सभागृहात हिरामण तुरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पेण तालुका कार्यकारिणी, जिल्हा कार्यकारिणी, विभाग प्रमुख, अर्थ विभाग या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविक गुरूनाथ पाटील, अहवाल वाचन मुरलीधर म्हात्रे, सूत्रसंचलन श्रीमती उत्तरा पाटील यांनी केले. जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील यांनी निवड श्रेणी, गटविमा, फंड, अंशदान, उपादान याविषयी महत्वपूर्ण माहिती दिली.उपाध्यक्ष स.रा. म्हात्रे जिल्हा यांनी सहकार विषयी व संघटनेच्या कामाविषयी माहिती दिली. नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष पेण राजाराम गावंड यांनी संघटना आपले सर्वांची एकजुटीने काम करते आपण एकसंघ राहून काम करू या असे सांगितले. गुरूनाथ पाटील सरचिटणीस रायगड जिल्हा यांनी सर्व शिक्षकांची कामे कशा रितीने होतात. तसेच ऑफिसकडून आणलेली माहिती नावानिशी वाचून दाखवली. अध्यक्षीय भाषणात आपली संघटना आपल्या सर्वांच्या सहमतीने, एकजूटीने कार्य करत आहे. म्हणून नावारूपास आली आहे. संघटनेमुळे आपली कामे होतात. तसेच संघटनेच्या माध्यमातून दिनांक १६ जुलै रोजी श्री बल्लाळेश्वर पाली व एकविरा देवीदर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.शेवटी जगन्नाथ मोकल यांनी आभार मानले. ही सभा यशस्वी होण्यासाठी पांडुरंग म्हात्रे, प्रदीप म्हात्रे, विश्वनाथ कोठेकर व इतर सर्व सहकारी यांनी परीश्रम घेतले.

## कोपरखैरणेतील खड्डेमय रस्त्यांच्या अपूर्ण डागडुजीमुळे नागरिक त्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**नवी मुंबई :** कोपरखैरणे परिसरातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था जुलै महिन्यातही सुधारलेली नाही. जागोजागी खड्डे, राडारोड्याचे ढिगारे, उघड्या भूमिगत केबल्स आणि अपूर्ण डागडुजीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाने जोर धरल्याने हे रस्ते प्रवासासाठी अधिकच धोकादायक ठरत असून, यंदाही खड्यांचे साम्राज्य निर्माण होणार, अशी भीती व्यक्त होत आहे.

कोपरखैरणे नोडमधील वाशी-कोपरखैरणे मुख्य रस्ता वगळता बहुतेक सर्व अंतर्गत रस्ते डांबरी आहेत. सध्या मुख्य मार्गावर कामे वेगात सुरू असली तरी अंतर्गत रस्त्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. सेक्टर १९ A, B, C तसेच सेक्टर ६, ७, ८ या भागांत तात्पुरत्या स्वरूपात मिक्श्चर टाकून खड्डे बुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, स्वच्छता न ठेवता मातीवरच मिश्रण टाकण्यात आल्याने ते पुन्हा उखडले आहे, असा आरोप रहिवासी संग्राम कामत यांनी केला.

अनेक ठिकाणी भूमिगत केबल टाकताना पुरेशी काळजी घेतली जात नसल्याने त्या उघड्या अवस्थेत आल्या आहेत. त्याचप्रमाणे, बांधकाम स्थळांवरील राडारोडा थेट रस्त्याच्या कडेला टाकल्याने रस्त्यांवर अडथळे निर्माण होत आहेत. हे सर्व प्रकार नागरी सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर ठरत आहेत.

## अ‍ॅट्रोसिटी गुन्ह्यातील आरोपींचा जामीन मुंबई हायकोर्टाने फेटाळला !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड :: दिलिप पवार**

म्हसा यात्रेनिमित्ताने सरळगावच्या नाक्यावर बॅनर लावण्याच्या वादातून मुरबाड पोलिस ठाण्यात अक्षय घुडे, विष्णू घुडे, वैभव घुडे व इतर ५ ते ६ आरोपीं विरोधात नवीन फौजदारी कायदा भारतीय न्याय संहिता, अ‍ॅट्रॉसिटी प्रिव्हेन्शन कायदा व महाराष्ट्र पोलीस अधिनियमांन्वये विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. तद्नंतर यातील आरोपी वैभव यांस इन्ट्रीम जामीन मिळाला तर इतर दोघांना गुरुवारी उच्च न्यायालयाने जामीन नाकारला. याबाबत माहिती देण्यासाठी फिर्यादी पक्षाकडून शुक्रवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करून उच्च न्यायालयाचे आभार मानण्यात आले. १३ जानेवारी रोजी सरळगावच्या नाक्यावर म्हसा यात्रेकरूंच्या स्वागताचे बॅनर लावण्यास आरोपीतांकडून विरोध करण्यात आला होता. यातून घडलेल्या वादात अ‍ॅड. प्रफुल रोकडे व त्यांचे लहान भाऊ अक्षय रोकडे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी मुरबाडच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तर आरोपी सुमारे सात महिन्यांपासून फरार असल्याचे रोकडे यांनी सांगितले. दरम्यान आरोपींच्या अटकेसाठी फिर्यादी पक्षाकडून मोर्चे, आंदोलने तसेच उपोषण करण्यात आले होते. परंतु आरोपी अजूनही मोकाट असल्याने पोलिसांच्या भूमिकेवर संशय निर्माण झाल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेतून स्पष्ट केले. मात्र आता आरोपींकडून साक्षीदारां समवेत माझे आणि माझे संपूर्ण कुटुंबाला घातपाताचा धोका असल्याची दाट शक्यता व्यक्त करून रोकडे यांनी आपल्या कुटुंबा समवेत आरोपींच्या अटकेसाठी लवकरच मुरबाड पोलिस स्टेशनसमोर बेमुदत उपोषणाची भूमिका घेणार असल्याचे म्हणाले. त्यामुळे याप्रकरणी पोलिस काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## डोंबिवलीत ठाकरे गटाची ताकद वाढली

### शेकडो कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली :** डोंबिवलीसाठी राजकीयदृष्ट्या ऐतिहासिक ठरला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख मा. उद्धवजी बाळासाहेब ठाकरे साहेब आणि युवानेते मा.आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या लोकाभिमुख कार्यशैलीने प्रेरित होऊन, डोंबिवली शहर प्रमुख प्रकाशजी तेलगोटे यांच्या माध्यमातून, शिंदे गट व कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते पक्षत्याग करून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या जाहीर प्रवेशात प्रवीण गणपत साळवी (शिंदे गट ,वाहतून सेना कल्याण डोंबिवली अध्यक्ष), कैलास दिनकर सणस(ग्राहक संरक्षण कक्ष उप शहर संघटक व उप- विभाग प्रमुख शिंदे गट), आणि शिबू शेख(महाराष्ट्र प्रदेश सचिव, अल्पसंख्यख विभाग कॉंग्रेस ) यांच्यासह सुमारे १५०- २०० पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमुखी निर्णय घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या बाळासाहेबांच्या खऱ्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या पक्षात प्रवेश केला.

या महत्वपूर्ण प्रवेश सोहळ्याला कल्याण जिल्हा प्रमुख मा.दिपेश पुंडलिक म्हात्रे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत करताना त्यांनी सांगितले की, "आजचा हा शक्तीप्रवेश म्हणजे डोंबिवलीतील जनतेचा विश्वास ठाकरे कुटुंबियांच्या नेतृत्वावर असून, ही लाट भविष्यात अजून प्रबळ होणार आहे."

या पक्ष प्रवेश सोहळयामुळे डोंबिवलीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची ताकद अधिक बळकट झाली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग पक्षवाढीला अधिक गती देईल, असा विश्वास दिपेश म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

या प्रवेश सोहळ्यात कल्याण जिल्हा संघटक तात्यासाहेब माने , डोंबिवली शहर सचिव सुरेश परदेशी संजय पाटील, श्याम चौगुले चेतन म्हात्रे महिला आघाडी कल्याण ग्रामीण व डोंबिवली विधानसभा संघटक सुप्रियाताई चव्हाण, प्रियांका विचारे युवासेनेचे आदित्य पाटील, युवती सेनेचे रिचा कामतेकर तसेच शिवसेना पक्षाचे पदाधिकारी शिवसैनिक महिला आघाडी युवासैनिक उपस्थित होते.



## आमदार सुलभा गायकवाड यांच्यावतीने वह्यांचे वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :**माजी आमदार गणपत गायकवाड आणि सध्याच्या आमदार सुलभा गणपत गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त कल्याण येथील तिसई कार्यालयासमोर एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत एकूण ११,००० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून राबविण्यात आला असून, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल जागरूकता वाढवणे हा त्यामागील प्रमुख उद्देश होता.

## डोंबिवलीत दोन घटनामध्ये दीड लाखांची रुपयांची चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** शहरात घरफोडी, वाहनचोरी, सायबर लूट अशा तक्रारी असतात. आता यामध्ये रोख रक्कम चोरण्याच्या घटनांची भर पडत आहे. डोंबिवलीत अज्ञात चोरट्यांनी दोन घटनांमध्ये १ लाख ५७ हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला आहे. या घटनांची तक्रार पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार उमेशनगर, देवीचापाडा डोंबिवली पश्चिम येथील अनिता गणेश म्हात्रे यांचा मासळी विक्रीचा व्यवसाय आहे. शुक्रवारी रात्री ८ ते ९:३० दरम्यान तोकडे बिल्डिंग येथील मच्छिमार्केट येथे मासे विक्री करीत होत्या. त्यांनी मच्छीच्या पाटीजवळ हिरव्या रंगाच्या पिशवित ठेवलेल्या पाकिटातून पन्नास हजार रुपये अज्ञात चोरट्याने घेऊन पोबारा केला. याविषयी तक्रार विष्णूनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत काटई-निळजे, डोंबिवली पूर्व येथील उद्योजक जनार्दन बाळाराम पाटील हे राहते घरी झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी शनिवारी रात्रीचे वेळी यांचे राहते घराचा दरवाजा तोडुन आतमध्ये प्रवेश करुन १ लाख ७ हजार रोख रक्कम चोरी करुन पोबारा केला. या विषयी मानपाडा पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून दोन्ही घटनांचा पोलिस तपास करीत आहेत.







"ठाणे जीवनदीप वार्ता" हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; AIS Printing Solution येथे छापून, Building No-B-24, Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) RNI No. MAH/MAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024

(सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अ‍ॅड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com